कोर्ट विद्यमान उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांचे कार्यालय
सिव्हील लाईन, रेल्वे स्टेशन रोड, हिंगणघाट जि.वर्धा

दुरध्वनी क्रमांक : 07153-244080 ई-मेल sdmhinganghat@gmail.com

क्र.टे-1/उविअ/अकृषक/कावि-443/2022 दिनांक : 27 जून,2022

विषय :- मौजा-पिपंळगाव(मा)ता.हिंगणघाट जि.वर्धा येथील सर्वे नं 257/1,257/2,257/3 आराजी 4.36 हे.आर अकृषक जमिनीचे विकास कामे पुर्ण केल्याबद्दलचे कम्पलीशन (Completion Certificate) सर्टीफीकेट मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. अर्जदार श्री.महेश शंकरराव गुल्हाणे रा.वर्धा यांनी सादर केलेला अर्ज दि.9.5.2022
2. या कार्यालयाचे पत्र दिनांक 19.5.2022
3. तहसिलदार,हिंगणघाट यांचे पत्र क्र.मह.सहा.प्रस्तु-1/कावि-1142/2022 दि.21.6.2022

प्रमाणपत्र

याव्दारे प्रमाणित करण्यात येते की, अर्जदार श्री.महेश शंकरराव गुल्हाणे रा.वर्धा रा.हिंगणघाट यांनी त्यांचे मालकीचे मौजा-पिंपळगाव(मा) ता.हिंगणघाट जि.वर्धा येथील परावर्तीत सर्वे नं 257/1,257/2,257/3 आराजी 4.36 हे.आर जमिनीचे अभिन्यासातील विकास कामे पुर्ण केल्याबद्दलचे कम्पलीशन (Completion Certificate) सर्टीफीकेट मिळण्याकरीता दि.9.5.2022 अन्वये विनंती केली असून प्रस्तुत संबंधाने, तहसिलदार, हिंगणघाट यांनी त्यांचे संदर्भीय पत्र दि.21.6.2022 अन्वये अहवाल सादर केला असून त्यानुसार अभिन्यासात खालीलप्रमाणे विकास कामे केली असल्याबाबत कळविले आहे.

1. सिमेंट कॉंकरेट रोड तयार करण्यात आलेले आहे.
2. सिमेंट कॉंकरेट नाली तयार करण्यात आलेली आहे.
3. स्ट्रीट लाईट बसविण्यात आले आहे.
4. संपुर्ण ले आऊटमध्ये इलेक्ट्रीक लाईनचे खांब बसविण्यात आलेले आहे.
5. सिमेंट कॉंक्रेट पुल तयार करण्यात आलेले आहे.
6. ओपन स्पेस मध्ये गार्डन व संपुर्ण ओपन स्पेसला सिमेंट वॉल कंपाऊड करण्यात आलेली आहे.
7. पाणी पिण्यासाठी बोअरवेल व विहीर तयार करण्यात आलेली आहे.
8. रोडच्या बाजूला झाडे ट्रीगार्डसह लावण्यात आलेले आहे.
9. संपुर्ण ले आऊटला प्रिकास्ट वॉल कंपाऊंड तयार करण्यात आलेली आहे.
10. सिमेंट कॉंक्रेट रोडच्या बाजूला गट्टू भरण्यात आलेले आहे.
11. ले आऊटला गेट बसविण्यात आलेले आहे.
12. ओपन स्पेसमध्ये मुलांना खेळण्याकरीता विवीध खेळणी लावण्यात आलेली आहे.
13. ओपन स्पेसमध्ये ओपन जिम बसविण्यात आलेली आहे.
14. संपुर्ण ले आऊट मध्ये झाडांना पाणी देण्याकरीता ठिंबक सिंचन सुविधा लावण्यात आलेली आहे.

अर्जदार यांनी मौजा-पिपंळगाव(मा) ता.हिंगणघाट जि.वर्धा येथील सर्वे नं 257/1,257/2,257/3 आराजी 4.36 हे.आर परावर्तीत जमिनीवर वरीलप्रमाणे विकास कामे पुर्ण केले असल्याबाबत तहसिलदार,हिंगणघाट यांनी प्रमाणित केले असल्याने अर्जदार यांना अभिन्यासातील विकास कामे पुर्ण केल्याबद्दल कम्पलीशन प्रमाणपत्र (Completion Certificate) याव्दारे देण्यात येत आहे.

(शिल्पा क.सोनाले)
उपविभागीय अधिकारी
हिंगणघाट

Scanned with CamScanner